# बृहन्मुंबई महानगरपालिका

**जाहीर सूचना**

विषय- कोंडवाडा विभागातील श्रमिकांची रिक्त पदे अशासकीय बेरोजगार व बहुउद्येशिय कामगार संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहीर सूचना.

----------------------

सदर सूचनेव्दारे नोंदणीकृत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, बृहन्मुंबईतील रस्त्यावर फिरणारी भटकी मोकाट जनावरे पकडण्याची कारवाई करणेकामी खालील अटींनुसार अशासकीय बेरोजगार व बहुउद्येशिय कामगार पुरविण्याबाबत इच्छुक अशासकीय (एन.जी.ओ.) संस्थांकडून कोंडवाडा अधिकारी, गुरांचा कोंडवाडा कार्यालय, २री मामलेतदार वाडी, श्री वासुदेव बिल्डिंग, तळमजला, रुम नं.७,मालाड (प), मुंबई – ४०००६४ यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या संस्थांनी खालील नमूद आवश्यक कागदपत्रांसहित दि.०५.०२.२०२४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सीलबंद अर्ज कोंडवाडा अधिकारी, गुरांचा कोंडवाडा कार्यालय, २री मामलेतदार वाडी, श्री वासुदेव बिल्डिंग, तळमजला, रुम नं.७,मालाड (प), मुंबई – ४०००६४ येथे सीलबंद पेटीत टाकावे.

अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) संस्थांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर कामांसाठी फक्त कोंडवाडा विभागाच्या कार्यक्षेत्रातील अशासकीय संस्थांनी (धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत संस्था) अर्ज करावेत.

२. कार्यादेश दिलेल्या दिनांकापासून पुढील कामगार ०५ महिने २० दिवसांच्या कालावधीकरिता, आवश्यकतेनुसार कामगार पुरविणे.

३. प्रतिदिन प्रती कामगार ७४३.८४ + लेव्हीचे अधिदान परिपत्रक क्र.प्रकाअ ६४ दि.३०.०४.२०११ च्या अटीच्या पूर्ततेनंतर (प्रतीपूर्ती स्वरुपात) करण्यात येईल.

४. कोंडवाडा विभागातील अधिका-यांच्या सूचनेनुसार रोजच्या कामाकरिता मागणी केल्याप्रमाणे (सकाळ/दुपार/रात्र) सुरळीतपणे विनाविलंब, सक्षम कामगारांचा पुरवठा करणे, सदर अटींचा भंग झाल्यास प्रपत्र 'ब'प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५. पुरवठा केलेल्या कामगारांच्या देयकाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परीक्षणानंतर विभागीय लेखा सांकेतांक २२०८००४०० या लेखाशीर्षातून संबंधित संस्थेला ई.सी.एस. / एन.ई.एफ.टी.व्दारे अधिदान केले जाईल.

६. संस्थेने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या कामगारांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत दरमहा वेतनाचे अधिदान आरटीजीएस / एन.ई.एफ.टी.व्दारे करणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास संस्थेचे काम रद्द करुन संस्था काळया यादीत टाकण्यात येईल. महानगरपालिकेकडून आरटीजीएस / एन.ई.एफ.टी.व्दारे अधिदान मिळाले नसले तरीही कामगारांना विहित वेळेत अधिदान करणे बंधनकारक आहे, अन्यथा प्रपत्र 'ब' प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.

७. बाल कामगारांचा पुरवठा करणे निषिध्द आहे व तसे केल्यास त्याची संपूर्णत: कायदेशीर जबाबदारी संबंधित अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचीच राहील.

८. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांनी नोंदणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशील, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

९. सदर कामांसाठी इच्छुक अशासकीय संस्था वस्तू व सेवाकर अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

१०. उपरोक्त अटींचे पालन न करणा-या व समाधानकारकरीत्या काम न करणा-या अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांच्याकडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरित थांबविण्याचे अधिकार कोंडवाडा अधिकारी यांना राहतील.

११. अशासकीय संस्था(एन.जी.ओ.) यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन लॉटरी पध्दतीने पात्र अशासकीय संस्थेची निवड करण्यात येईल. उपरोक्त निकषामध्ये न बसणा-या संस्थांना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

लॉटरीची तारीख – ०७.०२.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

सही/-
कोंडवाडा अधिकारी
कोंडवाडा कार्यालय मालाड (प )

पीआरओ/ / एडीव्ही /२०२३-२४